अध्यक्ष महोदय,

मी, आता अर्थसंकल्पाचा भाग-दोन सभागृहासमोर सादर करीत आहे.

१. सन २०१८-१९ साठी राज्याचा कर संकलनाचा सुधारित अंदाज रुपये एक लाख अठ्ठ्याऐंशी हजार नऊशे एकतीस कोटी होता. राज्याने रुपये एक लाख सत्त्याऐंशी हजार पाचशे एक्केचाळीस कोटी कर संकलित केला आहे.

**वस्तू व सेवा कर.**

२. संपूर्ण देशामध्ये सर्वसंमतीने लागू केलेल्या वस्तू व सेवा कर प्रणालीस आता दोन वर्ष पूर्ण होत आहेत. "एक देश एक कर" संकल्पनेवर आधारित या कार्यप्रणालीने अप्रत्यक्ष करासंदर्भात राज्या-राज्यामध्ये असलेल्या तटबंद्या नष्ट केल्या आहेत. जीएसटी प्रणाली आता स्थिरावत असून व्यापार व उद्योगास त्याचे फायदे जाणवत आहेत. "ईज ऑफ डुईंग बिझनेस" साठी आवश्यक असलेली व्यापारसुलभता जीएसटी प्रणालीत अंतर्भूत करण्याकरिता निरंतर प्रयत्न करण्यात येत आहेत. जीएसटीच्या अवलंबनानंतर महाराष्ट्रामध्ये कराचा पाया विस्तृत झाला असून नोंदीत करदात्यांची संख्या सात लाख पंच्याहत्तर हजारावरुन पंधरा लाख पन्नास हजारावर गेली आहे.

**महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क तडजोड अध्यादेश, २०१९.**

३. या सभागृहाच्या सर्व सन्माननीय सदस्यांना माहीत आहेच की, माहे फेब्रुवारी २०१९ मध्ये सादर केलेल्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये मूल्यवर्धित कर कायद्याखालील तसेच राज्यकर विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध कायद्याखालील थकबाकीच्या शीघ्र वसुलीसाठी अभय योजना जाहीर करण्यात आली होती. विविध स्तरावर प्रलंबित अपील प्रकरणे त्वरित निकाली निघावीत व थकबाकीची वसुली जलदगतीने व्हावी हा देखील या योजनेचा हेतू आहे. यासाठी राज्यपाल महोदयांनी ६ मार्च २०१९ रोजी अध्यादेश प्रख्यापित केलेला आहे. त्यानुसार थकबाकी तडजोड योजना सध्या अंमलात आहे.

या योजनेअंतर्गत दिनांक १७ जून २०१९ पर्यंत पंधरा हजार सहाशे पन्नास इतके अर्ज प्राप्त झालेले असून साडे सातशे कोटी रुपये इतका महसूल प्राप्त झाला आहे. अपेक्षेप्रमाणे या योजनेस उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे दिसते.

या योजनेच्या सुलभ आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी सदर अध्यादेशामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे. तद्नुसार महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड अध्यादेश, २०१९ मध्ये काही सुधारणा प्रस्तावित आहेत त्या खालीलप्रमाणे असतील :—

- अभय योजनेअंतर्गत लाभ मिळण्यासाठी अर्जदारास अत्यावश्यक रकमेचा भरणा करणे जरुरी आहे. अविवादित कर संपूर्णपणे व काही प्रमाणात विवादित कर, व्याज, शास्ती व विलंब शुल्काचा भरणा केल्यास उर्वरित विवादित कर, व्याज, शास्ती व विलंब शुल्कामध्ये अध्यादेशास जोडलेल्या परिशिष्ट-क आणि परिशिष्ट-ख प्रमाणे माफी मिळण्याबाबत तरतूद आहे.

- सन्माननीय सभागृहास कळविण्यास मला आनंद होतो की, जास्तीत जास्त करदात्यांना या अभय योजनेचा फायदा घेता यावा व अत्यावश्यक रक्कम भरण्यासाठी व अर्ज सादर करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून सदर योजनेस मी एक महिन्याची मुदत वाढ प्रस्तावित करत आहे. सबब, यानुसार प्रथम टप्पा ३१ जुलै २०१९ रोजी तर द्वितीय टप्पा ३१ ऑगस्ट २०१९ रोजी संपेल. तसेच दिनांक १६ ऑगस्ट २०१९ पर्यंत पारीत होणारे वैधानिक आदेश, दाखल होणारे विवरण किंवा सुधारित विवरणासाठीही या योजनेचा लाभ उपलब्ध असेल. यासाठी अध्यादेशामध्ये सुधारणा प्रस्तावित आहे.

- अध्यादेशातील सध्याच्या तरतुदीनुसार कोणत्याही वैधानिक आदेशानुसार मागणी केलेल्या रकमेपोटी ३१ मार्च २०१९ रोजी किंवा तत्पूर्वी काही रक्कम भरणा केली असल्यास ती रक्कम प्रथमत: कराशी समायोजित होईल व अशा समायोजनानंतर शिल्लक असणारी रक्कम ही व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क

यापोटी अनुक्रमे समायोजित करण्याबाबत तरतूद आहे. परंतु, सदर करापोटीचे समायोजन हे अविवादित करासाठी असेल की, विवादित करासाठी असेल याबाबत स्पष्टता येणे आवश्यक आहे.

- सबब, उक्त थकबाकीतील अविवादित कर व विवादित कर यांच्या गुणोत्तराचे गणन करुन ३१ मार्च २०१९ पर्यंत भरणा केलेली रक्कम वजा केल्यानंतर शिल्लक असणाऱ्या रकमेस वरील गुणोत्तरानुसार तडजोड योग्य अविवादित व विवादित कराची रक्कम परिगणित करण्याबाबत सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहे.

- मूल्यवर्धित कर कायद्यातील अपील विषयक तरतुदीनुसार केंद्रीय विक्रीकर कायदा, १९५६ खालील नमुने किंवा प्रमाणपत्र निर्धारणेच्या वेळेस प्राप्त न झाल्याने निर्माण होणाऱ्या वसुलीविरुद्ध अपील दाखल करण्यासाठी १०० टक्के कराची रक्कम भरणे आवश्यक आहे. अशी ३१ मार्च २०१९ पर्यंत भरणा केलेली रक्कम उक्त नमुने किंवा प्रमाणपत्र निर्धारणेच्या वेळेस प्राप्त न झाल्यामुळे येणाऱ्या करदायित्वापोटी समायोजित होईल. अशा परिस्थितीमध्ये, अर्जदारास फक्त व्याज आणि शास्तीसाठी तडजोडीचा लाभ घेता येईल. तसेच काही मुद्यांच्या बाबतीत अपील अंशत: मागे घेतले असल्यास व इतर काही मुद्यांच्या बाबतीत अपील चालू ठेवले असल्यास ३१ मार्च २०१९ रोजी किंवा तत्पूर्वी भरणा केलेल्या रकमेचे समायोजन वरील परिच्छेदात प्रस्तावित केलेल्या सुधारणेनुसार होईल.

- प्रवेशकर अधिनियम, १९८७ अन्वये प्रलंबित असणाऱ्या थकबाकीच्या तडजोडीसाठी सुद्धा अभय योजना लागू आहे. सदर कायद्याखालील १ एप्रिल २०१९ रोजी वैधानिक आदेशानुसार अथवा सदर कायद्याप्रमाणे देय असणाऱ्या थकबाकीच्या तडजोडीसाठी अध्यादेशातील तरतुदीनुसार लाभ घेतल्यास अशा अर्जदारास मूल्यवर्धित कर नियम, २००५ अथवा मुंबई विक्रीकर नियम, १९५९ अनुसार ३१ मार्च २०१९ रोजी, तत्पूर्वी किंवा तद्नंतर भरणा केलेल्या कोणत्याही रकमेची वजावट मिळणार नाही, अशी तरतूद प्रस्तावित आहे. प्रस्तुत सुधारणेमुळे सदर बाबतची संदिग्धता दूर होण्यास मदत होईल.

● अध्यादेशातील सध्याच्या तरतुदीनुसार, अत्यावश्यक रकमेचा भरणा केल्यास, अर्जदार विवादित कर, व्याज, शास्ती व विलंब शुल्क यांच्या शिल्लक रकमेच्या माफीस पात्र ठरेल अशी तरतूद आहे. परंतू, अत्यावश्यक रकमेपेक्षा कमी रकमेचा भरणा केला असल्यास अर्जदारास अशा रकमेच्या प्रमाणात लाभ घेता येतो.

सदर तरतुदीमध्ये स्पष्टता यावी यासाठी सुधारणा प्रस्तावित आहे. सबब, अशी भरणा केलेली रक्कम प्रथमत: संपूर्ण अविवादित करापोटी समायोजित होईल आणि अशा समायोजनानंतर शिल्लक असलेली रक्कम विवादित कर, व्याज, शास्ती आणि विलंब शुल्क ज्या प्रमाणात अत्यावश्यक रकमेचा भरणा कमी केला असेल त्या प्रमाणात समायोजित होईल व अशा परिस्थितीमध्ये कमी भरणा केलेल्या रकमेच्या प्रमाणात लाभाचे परिगणन करण्यात येईल.

● करदात्याने केलेल्या स्वयंनिर्धारित कर, व्याज, विलंब शुल्क किंवा संबंधित कायद्यान्वये लादण्यात येणाऱ्या शास्तीच्या रकमेस देखील सदर अध्यादेशान्वये तडजोडीची तरतूद उपलब्ध आहे. याकरिता, अध्यादेशास जोडलेल्या परिशिष्ट-क व परिशिष्ट-ख मध्ये तसेच अध्यादेशाच्या कलम २ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) मध्ये तांत्रिक सुधारणा प्रस्तावित आहेत.

● अध्यादेशातील कलम २ च्या उप-कलम (१) मधील खंड (थ) च्या तरतुदीनुसार अविवादित कराची व्याख्या देण्यात आलेली आहे. या खंडाच्या उप-खंड (सहा) मध्ये सुधारणा प्रस्तावित आहे. सदर सुधारणेमुळे कर, व्याज व विलंब शुल्क या रकमेऐवजी फक्त कराची रक्कम आता अविवादित कर म्हणून संबोधण्यात येईल. यामुळे जास्तीत जास्त करदात्यांना या तडजोड योजनेचा फायदा घेता येईल.

● उपरोक्तप्रमाणे तडजोड अध्यादेशातील प्रस्तावित सुधारणा १ एप्रिल २०१९ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू होतील.

४. अध्यक्ष महोदय, शासनाच्या “ ईज ऑफ डुईंग बिझनेस ” या धोरणाच्या अनुषंगाने कर अधिनियमात आता मी काही बदल प्रस्तावित करीत आहे.

## कर अधिनियमातील सुधारणा

➢ **व्यवसाय कर अधिनियम :-**

● सर्व व्यावसायिक नाव-नोंदणी प्रमाणपत्र धारकांना प्रत्येक वर्षी व्यवसायकराचा भरणा आगाऊ म्हणजे चालू वर्षाच्या ३० जून पर्यंत करावा लागतो. अनेक नाव-नोंदणी प्रमाणपत्र धारकांकडे नोकर असल्याने त्यांना व्यवसायकराची कालावधीनिहाय विवरणे देखील दाखल करावी लागतात. या विवरणांची नियतकालिकता त्यांच्या वार्षिक करदायित्वावर अवलंबून असते. या कारणास्तव त्यांना वारंवार अनुपालने करावी लागतात. या सर्व बाबींचा विचार करता " ईज ऑफ डुईंग बिझनेस " या धोरणाच्या अनुषंगाने मी असे प्रस्तावित करतो की, सर्व नाव-नोंदणीधारक व्यावसायिकांना वर्षअखेर पर्यंत व्यवसाय कर भरण्याची मुभा असेल. या प्रस्तावामुळे सर्व व्यावसायिकांना दिलासा मिळेल, हे नक्की. सदर सुधारणा ही वर्ष २०१९-२० पासून अंमलात येईल.

➢ सध्याच्या तरतुदींनुसार जर एखाद्या व्यावसायिकाने नाव-नोंदणी प्राप्त करण्यास उशीर केल्यास त्या व्यक्तीवर रुपये २ प्रतिदिन दराने शास्ती लादली जाऊ शकते. अनेक प्रकरणी नाव-नोंदणी घेण्यातील कसूर जाणीवपूर्वक नसल्याचे दिसते. अशा प्रकरणांत शास्ती अन्यायकारक होऊ शकते. यामुळे, मी नाव-नोंदणी प्राप्त करण्यास कसूर झाल्यास लागणारी शास्ती रद्द करण्याचे प्रस्तावित करीत आहे. मात्र, त्याचबरोबर कर अनुपालनात शिस्तीची देखील आवश्यकता असल्याने मी असे प्रस्तावित करतो की, अशा प्रकरणांत १.२५ टक्के प्रतिमाह किंवा त्याच्या काही भागास अशा निश्चित दराने व्याजाची आकारणी केली जाईल.

➢ **मूल्यवर्धित कर अधिनियम :-**

● विभागातील सध्याच्या प्रचलित पद्धतीनुसार व्यवहारनिहाय अथवा सर्वसमावेशक मूल्यवर्धित कर निर्धारणा केली जाते. काही व्यापारी विवरणात परताव्याचा दावा करीत असतात. तथापि, विभागाने केलेल्या सांख्यिकीय विश्लेषणावरुन असे

देखील दिसत असते की, अशा व्यापाऱ्यांच्या काही व्यवहारांमध्ये करदायित्व असू शकते. कित्येक वेळा, हिशोबाची सर्व पुस्तके व्यापाऱ्यांना सादर करावी लागू नयेत म्हणून करदायित्वाची रक्कम विचारात घेऊन अशा व्यापाऱ्यांची प्रकरणे व्यवहार-निहाय निर्धारणेसाठी निवडली जातात, ज्यामुळे व्यापाऱ्यांच्या वेळेची बचत देखील होते. मूल्यवर्धित कर अधिनियमात असा बदल करणे प्रस्तावित आहे की, व्यापाऱ्याने विवरणात दावा केलेल्या किंवा लेखापरीक्षण अहवाल नमुना-७०४ मध्ये दर्शविलेल्या परताव्याचा देखील विचार व्यापाऱ्याची व्यवहारनिहाय निर्धारणा करताना केला जाईल. असा परताव्याचा दावा केलेली विवरणे किंवा लेखापरीक्षण अहवाल नमुना-७०४, दिनांक ३१ मार्च २०१९ पर्यंत दाखल केलेले असावे. या प्रस्तावामुळे ज्या व्यापाऱ्यांचा विवरणातील किंवा लेखापरीक्षण अहवाल नमुना-७०४ मध्ये दर्शविलेल्या परताव्याचा दावा, निर्धारणा अधिकाऱ्याने निश्चित केलेल्या कर दायित्वापेक्षा अधिक आहे, त्यांना करदायित्वाचे समायोजन करुन उर्वरित परताव्याची रक्कम दिली जाऊ शकेल. त्याचबरोबर, ज्या व्यापाऱ्यांचा विवरणातील किंवा लेखापरीक्षण अहवाल नमुना-७०४ मधील परतावा, निर्धारणा अधिकाऱ्याने निश्चित केलेल्या कर दायित्वापेक्षा कमी आहे, त्यांचेकडून अशा परताव्याच्या रकमेचे समायोजन करुन केवळ निव्वळ देय कराची मागणी केली जाऊ शकेल. उक्त परतावा विहित करण्यात येतील अशा अटी, शर्ती व सुरक्षिततेच्या अधीन राहून देण्यात येईल. १ एप्रिल २००५ पासून सदर बदल करण्याचे मी प्रस्तावित करतो, जेणेकरुन सुधारित तरतूद निर्धारणा आदेशाविरुद्ध दाखल केलेल्या प्रलंबित अपिलांस देखील लागू होऊ शकेल.

- ज्या व्यापाऱ्यांची वार्षिक उलाढाल रुपये १ कोटीपेक्षा अधिक आहे अशा व्यापाऱ्यांना त्यांची हिशोबाची पुस्तके लेखापालाकडून तपासून घेऊन विभागाकडे नमुना-७०४ नमुन्यात लेखापरीक्षण अहवाल दाखल करणे अनिवार्य असते. या सभागृहातील सन्माननीय सभासदांना माहीत आहेच की, दिनांक १ जुलै २०१७ पासून वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी झाल्यापासून फक्त सहा वस्तुंवरच मूल्यवर्धित कराची आकारणी होते, त्यातील काही वस्तूंवर फक्त प्रथम टप्प्यावरच

कर आकाराणी होत असल्याने अनेक व्यापाऱ्यांची वार्षिक उलाढाल जरी रुपये एक कोटीपेक्षा अधिक असली तरी त्यांचे करदायित्व अत्यल्प असते किंवा निरंक देखील असते. या बाबींचा विचार करता मी असे प्रस्तावित करीत आहे की, ज्या व्यापाऱ्यांची एका वर्षातील उलाढाल रुपये एक कोटीपेक्षा अधिक आहे, परंतु त्या वर्षातील करदायित्व रुपये पंचवीस हजारांपेक्षा अधिक नाही, त्यांना लेखापालाकडून असे लेखापरीक्षण करून नमुना-७०४ दाखल करणे आवश्यक असणार नाही. सदर सुधारणा वर्ष २०१९-२० पासून अंमलात येईल. या प्रस्तावामुळे बहुतांश व्यापाऱ्यांचा अनुपालन खर्च वाचेल, अशी मला खात्री आहे.

५. या प्रस्तावांना सन्माननीय सभासदांचा पाठिंबा मिळेल, असा माझा विश्वास आहे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!